## निशाण क्र. ६७ वरील आदेश

वादी हिने प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरूस्तीस परवानगी मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे. तिच्या म्हणण्यानुसार, सदरील दावा वादीने प्रतिवादीविरूध्द शाखावार वाटपासाठी दाखल केला आहे. त्याप्रमाणे प्रत्येक शाखेतील उपलब्ध पक्षकाराना तसेच सातबारा सदरी नावे नमूद असलेल्या लोकांना याकामी प्रतिवादी म्हणून सामील केले आहे. मात्र दावा दाखल करण्यापूर्वीच सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. २ तारामती दत्ताराम गुरव, प्रतिवादी क्र. ११ रघुनाथ सोनू आलव, प्रतिवादी क्र. १७ सावित्री सोनू आलव हे मयत असल्याचे बेलिफ रिपोर्टवरून समजून आले. वादी ही महिला असून तीने सातबारा सदरी नावे दाखल असलेल्या लोकांना याकामी प्रतिवादी म्हणून सामील केले होते. सदर प्रतिवादी हे वादीच्या घरापासून दूर म्हणजे दुस–या गावात राहत असल्याने त्यांच्या वास्तव्याबाबत पुरेशी माहिती वादीस मिळू शकली नव्हती. तरी सदर दाव्याच्या कामी वर नमूद प्रतिवादी क्र. २, ११, १३ यांचे वारस खालीलप्रमाणे सादर करीत आहे. सबब सदर दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी वादीने विनंती केली आहे.

प्रतिवादी क्र. २ – तारामती दत्ताराम गुरव – मयत
प्रतिवादी क्र. २अ– मोहन दत्ताराम गुरव,
वय–४५वर्षे, व्यवसाय– शेती,
रा. मु.पो. पेंढरी, गुरववाडी,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

प्रतिवादी क्र. ११ –रघुनाथ सोनू आलव – मयत
प्रतिवादी क्र. ११अ–वंदना रघुनाथ आलव,
वय–५८वर्षे, व्यवसाय– शेती,
प्रतिवादी क्र. ११ब–गणेश रघुनाथ आलव,
वय–३०वर्षे, व्यवसाय– शेती,
दोघे रा. मु.पो. पुरळ, हुर्शी, गडदेवाडी,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

प्रतिवादी क्र. १३ –कृष्णा सोनू आलव – मयत

प्रतिवादी क्र. १३अ–सुनिता कृष्णा आलव,
वय–४५वर्षे, व्यवसाय– शेती,
प्रतिवादी क्र. १३ब–प्रशांत कृष्णा आलव,
वय–२६वर्षे, व्यवसाय– शेती,
प्रतिवादी क्र. १३क–संदेश कृष्णा आलव,
वय–२२वर्षे, व्यवसाय– शेती,
सर्व रा. मु.पो. पुरळ, हुर्शी, गडदेवाडी,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास नि. क्र. ७९ ला म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो त्यांना मान्य नाही. दाव्यातील नमूद मिळकतीतील हक्कसंबंध असलेले प्रतिवादी कोण मयत आहेत यांची खात्री करणे व त्याचे वारस दाव्यात सामील करणे हे दावा दाखल करणेपूर्वी करणेची जबाबदारी ही वादीची आहे. वादीनी दावा दाखल सदर प्रतिवादी हे हयात आहेत अगर यांची चौकशी करणेची तसदीही घेतलेली नाही. त्यामुळे आता दावा दाखल करणेपूर्वी मयत झालेले प्रतिवादीचे वारस दावा दाखल केलेनंतर सदर प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर आणता येणार नाहीत. शिवाय वादी यांनी त्यांचे अर्जात प्रतिवादी क्र. २, ११, १३ हे कोठे व केव्हा मयत झालेबाबत तारीख दिलेली नाहीत तसेच अर्जासोबत सदर प्रतिवादी यांचे मृत्यूप्रमाणपत्र ही हजर केलेले नाहीत. तरी सदर अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येवून वादी यांना सदर प्रतिवादी यांचे मृत्यूप्रमाणपत्र न्यायालयात हजर करणेस आदेश देणेत यावेत. सबब सदर अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. वादी, प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. प्रस्तूतचा दावा हा वाटप व कब्जाकरीता आहे असे दिसून येते. अर्जात नमूद केलेली दुरूस्ती दाव्यामध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. वाटपाच्या दाव्यामध्ये आवश्यक पक्षकारांना समाविष्ट करणे अनिवार्य आहे.

प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी आहे. सबब सदरची दुरूस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित वाटते. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात मूळीच बदल होणार नाही. तसेच सदर दुरूस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने आजपासून १४ दिवसांचे आत नियोजित दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड
दिनांक: १६/१०/२०१९

( बी. आर. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by Balkrishna Rajaram Patil
Date: 2019.10.17 10:48:23 +0530